महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०६ वे | दिनांक : २०/०७/२०२६ | वार : सोमवार

## आझाद मैदानातून आदित्य ठाकरेंचा मोदी सरकारला थेट इशारा



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे नेतृत्वात मुंबई येथील आझाद मैदानात सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. हे सरकार या आगीत भस्म झाले पाहिजे, असे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले. तर आदित्य ठाकरे यांनी देखील यावेळी बोलताना केंद्र सरकारवर टीका केली आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, देशातल्या तरुण आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी आज आंदोलने होत आहेत. आम्ही आता केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत. पण ही तर फक्त सुरुवात आहे. पुढे जाऊन आम्ही थेट या देशाच्या पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी करणार आहोत, असा आक्रमक इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, सोनम वांगचुक यांनी या आधीही लडाखला विशेष राज्याचा दर्जा मिळावा यासाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन केले होते. लोकसभा निवडणुकीच्या आधी भाजपने लडाखच्या जनतेला तसे आश्वासनही दिले होते. मात्र, भाजपला लडाखची जमीन उद्योगपती अदानी यांच्या घशात घालायची आहे. याच कारणामुळे सोनम वांगचुक यांना या आधी आंदोलन करावे लागले होते.

केंद्र सरकारवर टीका करताना आदित्य ठाकरे म्हणाले, या देशातील जनतेने भाजपला देश बदलण्यासाठी आणि विकास करण्यासाठी बहुमत दिले होते. मात्र, हे लोक आता देशाचे संविधान बदलू पाहत आहेत. इस्रोच्या 100 वैज्ञानिकांनी राजीनामा दिल्याचा प्रकार समोर आला आहे. जग कुठे चालले आहे आणि आपण कुठे आहोत? भाजपला इस्रोसारख्या महत्त्वाच्या संस्था सांभाळता येत नाहीत, पण दुसऱ्या पक्षांचे खासदार फोडण्यात ते व्यस्त आहेत. 'हर घर जल', 'स्मार्ट सिटी', 'प्रत्येकाला घर' या भाजपच्या घोषणा आता कुठे गेल्या? असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.महाराष्ट्राचा अभिजित दिपके हा तरुण मुलगा आज दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आणि न्यायासाठी उपोषणाला बसला आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा, ही त्याची प्रमुख मागणी आहे. मात्र, भाजप सरकार तरुणांच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी जनतेला धर्म आणि जातीच्या वादात अडकवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे. जग पुढे जात असताना भाजप आपल्याला 50 वर्षांपूर्वी काय झाले, यात अडकवून नेहरू विरुद्ध सरदार पटेल असा भूतकाळातील वाद उकरून काढत आहे, अशी टीका आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, पुढच्या 10 वर्षांत देशात 120 कोटी तरुणांना नोकऱ्यांची गरज असेल, मात्र केवळ 40 कोटी तरुणांनाच नोकऱ्या मिळतील अशी स्थिती आहे. भाजपच्या नेत्यांची मुले परदेशात शिकायला आणि स्थायिक व्हायला जातील. मग आपल्या सर्वसामान्य तरुणांनी कुठे जायचे? हे सरकार राम मंदिर आणि पंढरपूर लुटण्याचे काम करत आहे. त्यामुळे या भाजपसारख्या देशद्रोही पक्षाला सत्तेबाहेर काढले पाहिजे. आता देशात एकच नारा लागला पाहिजे. आधी शिक्षण मंत्री प्रधानांचा राजीनामा आणि नंतर थेट प्रधानमंत्र्यांचा राजीनामा, असा इशारा आदित्य ठाकरेंनी दिला.

दिल्लीत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू असून प्रकृती खालावल्याने सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या जागी आता दिल्लीच्या आंदोलनस्थळी कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके हे अन्नत्याग आंदोलनाला बसले असून त्यांना दिवसेंदिवस मोठा पाठिंबा मिळत आहे. याच आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मुंबईतही माजी मुख्यमंत्री व शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत एका आंदोलनाचे आयोजन केले होते. यावेळी वांगचूक यांच्या लढ्याला जाहीर पाठिंबा देत ठाकरे यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि भाजपावर सडकून टीका केली, तसेच 'हे सरकार आता घालवले पाहिजे', असा घणाघातही त्यांनी केला.

## मलकापूर हादरले! दाम्पत्याला लुटून विवाहितेवर सामूहिक अत्याचार



**बुलडाणा :** मलकापूर तालुक्यातील दुधलगाव परिसरात एक अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. दोन अज्ञात नराधमांनी शेतातील घरात घुसून एका दाम्पत्याला चाकू आणि विळ्याचा धाक दाखवून लुटले. त्यानंतर पतीला जीवे मारण्याची धमकी देत विवाहितेला बळजबरीने जवळच असलेल्या शेतात नेऊन दोघांनी आळीपाळीने सामूहिक बलात्कार केला. ही धक्कादायक घटना 17 जुलै रोजी रात्री 11 वाजेच्या सुमारास घडली असून, या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला आपल्या पतीसोबत दुधलगाव शिवारातील शेतामध्ये असलेल्या घरात झोपलेली होती. रात्री 11 वाजता दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या घराचा दरवाजा जबरदस्तीने तोडून आत प्रवेश केला. त्यापैकी एकाच्या हातात चाकू तर दुसऱ्याच्या हातात विळा होता. घरात घुसताच दोन्ही आरोपींनी दाम्पत्याला शस्त्रांचा धाक दाखवून धमकावण्यास सुरुवात केली. त्यांनी पतीजवळील मोबाईल आणि नगदी 600 रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले.

पैसे आणि मोबाईल लुटल्यानंतर आरोपींनी दाम्पत्याकडे सोन्या-चांदीच्या दागिन्यांची मागणी केली. मात्र, घरात दागिने उपलब्ध नसल्याचे दाम्पत्याने सांगितले. यामुळे संतप्त झालेल्या नराधमांनी दाम्पत्याला जबरदस्तीने ओढत जवळील शेतात नेले. तेथे पतीच्या गळ्याला विळा लावून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आणि विवाहितेवर दोघांनी आळीपाळीने अत्याचार केला. या अमानुष कृत्यानंतर दोन्ही आरोपी मोटारसायकलवरून अंधाराचा फायदा घेत पसार झाले.

या घटनेनंतर पीडित महिलेने मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात दोन आरोपींविरुद्ध सामूहिक बलात्कार, घरफोडी, आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांची पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना झाली असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक सतीश महल्ले करत आहेत. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण पसरले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जुलै २०२६


# शिक्षकांच्या चांगल्या कार्याने शाळेचा नावलौकिक वाढतो



**कन्नड (अरुण थोरात) :** देशासाठी चांगला नागरिक घडवणे ही शिक्षकांची जबाबदारी आहे. देशाला अभिप्रेत चांगले नागरिक घडवण्याचे काम सुभाष गोरे यांनी केले आहे. साडेपाच लाख मुलांना कलेचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. सुभाष गोरे यांच्या कार्यामुळे शाळेचा व संस्थेचा नाव लौकिक वाढला आहे,असे प्रतिपादन प्रसिध्द उद्योजक तथा श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रमुख मानसिंह पवार यांनी केले. ते दि.18 जुलै रोजी शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या विद्यालयातील जेष्ठ कलाशिक्षक सुभाष गोरे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, एके काळी हा तालुका सर्व क्षेत्रात पुढारलेला होता. आता तालुका राजकीय,सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने मागे पडला आहे. गोरे सरांसारख्या लोकांनी पुढाकार घ्यावा म्हणजे हा तालुका पुन्हा गतवैभव प्राप्त करेल. या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे, डॉ.ए.के.महाले, अप्पासाहेब देशमुख,विशाल आहेर, प्रल्हाद शिंदे,अन्वरखा पठाण, विलास पवार, नगरसेवक बंटी काशिनंद, सुधाकर देवकर, सुरेश डोळस, युवराज बनकर, प्रेमसिंग बैनाडे, बुलढाणा बँकेचे व्यवस्थापक वराडे, संतोष गोरे, अरविंद कांबळे, प्रा.रंगनाथ लहाने, प्रदीप सनांसे, मुख्याध्यापिका सुनिता दळवी, यांच्यासह सुभाष गोरे यांचे नातलग, मित्र परिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. या वेळी संस्थेच्या वतीने सुभाष गोरे यांचा सपत्निक सन्मान करण्यात येऊन त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत सुभाष गोरे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संजय जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. संजय त्रिभुवन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर विजय भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जागतिक पातळीवर रोटरी हीच एकमेव निस्वार्थी सेवाभावी संस्था...शरण पाटील




***फोटो ओळ :*** *मुरूम येथील पदग्रहण सोहळ्याप्रसंगी नूतन अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सचिव प्रकाश रोडगे व सर्व पदाधिकारी यांचा सत्कार करताना शरण पाटील, दिनेश पटेल, रवींद्र बनकर, चंद्रशेखर मुदकण्णा व अन्य.*

**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** ज्या संस्थेच्या माध्यमातून व्यक्ती केवळ आर्थिक मदत करत नाही, तर स्वतःला मानसिकदृष्ट्या सक्षम करून सेवाभावी वृत्तीने जगते आणि इतरांनाही जगण्याची नवी उमेद देते, ती म्हणजे रोटरी. खऱ्या अर्थाने जागतिक पातळीवर निस्वार्थपणे काम करणारी रोटरी ही एकमेव सामाजिक संस्था आहे, असे प्रतिपादन उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी केले.मुरूम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात शनिवारी (ता. १८) आयोजित रोटरी क्लब मुरूम सिटी चा पदग्रहण व चार्टर प्रदान सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते शरण पाटील होते. यावेळी पदग्रहण अधिकारी तथा सहाय्यक प्रांतपाल दिनेश पटेल, टीआरएफ चे रवींद्र बनकर, माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकण्णा, माजी अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, रोटरीचे नूतन अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सचिव प्रकाश रोडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. दिनेश पटेल यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. अशा काळात रोटरीसारख्या संस्थेत काम करणे म्हणजे स्वतःला समृद्ध करण्यासारखे आहे. रोटरी केवळ प्रकल्प राबवत नाही, तर ती माणसाला माणसात आणण्याचे आणि तुटलेले ऋणानुबंध पुन्हा जोडण्याचे पवित्र काम करते. येथे काम करताना मिळणारे समाधान हे कोणत्याही पदकापेक्षा मोठे असते. शेवटी त्यांनी रोटरीचे प्रांतपाल यांचा शुभ संदेश वाचून दाखवला.O रवींद्र बनकर यांनी जीवनाचा सार व्यक्त करताना म्हणाले, लोक अनेकदा दुःख संपल्यावर आनंदी होऊ, असे स्वप्न पाहतात. परंतु, वास्तविकता अशी आहे की, तुम्ही आनंदी राहिलात की दुःख आपोआप कमी होते. समाधानी वृत्ती ही माणसाला कोणत्याही परिस्थितीत स्थिर ठेवते. माणसाला जर खऱ्या अर्थाने सुख आणि शांती हवी असेल, तर त्यांनी पराकोटीची निस्वार्थ वृत्ती जोपासली पाहिजे. रोटरीचे कार्य हे त्याच निस्वार्थ वृत्तीचे प्रतीक आहे. मावळते अध्यक्ष सूर्यवंशी यांनी सन २०२५-२६ या वर्षात रोटरीकडून राबवण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांवर प्रकाश टाकला. गेल्या वर्षभरात समाजाच्या विविध स्तरांतील घटकांना मदत करण्याच्या उद्देशाने आम्ही अनेक विधायक उपक्रम हाती घेतले. विद्यार्थ्यांचा सहभाग आणि समाजाचा मिळालेला प्रतिसाद यामुळे हे उपक्रम यशस्वीपणे पूर्ण झाले.यावेळी नूतन अध्यक्ष स्वामी यांनी पुढील वर्षाच्या ध्येयधोरणांचे स्पष्टीकरणासह सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या सामाजिक उपक्रमांचे नियोजित आराखडे सर्वांसमोर ठेवले. मावळत्या अध्यक्षांनी घालून दिलेली ही परंपरा आम्ही अधिक व्यापक स्वरूपात पुढे नेणार आहोत. चालू वर्षात शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत विशेष सामाजिक उपक्रम राबवण्याचे आमचे उद्दिष्ट असल्याची भावना व्यक्त केली. कॉर्नर स्टील सेंटर, मुरूम यांच्या सौजन्याने आणि रोटरीचे सदस्य शरणप्पा धुम्मा यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा, कन्या प्रशाला आणि केंद्रीय प्राथमिक शाळेतील होतकरू गरीब विद्यार्थी-विद्यार्थीनींना टिफिन बॅग, स्टीलच्या पाणी बॉटल व स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. तसेच, कॉर्नर स्टीलचे प्रोप्रा. आकाश जगदाळे यांच्यातर्फे गरजू विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमात रोटरीचे नूतन सदस्य बसवराज पाटील कोथळीकर, प्राचार्य डॉ. राजशेखर हिरेमठ, ॲड. अमर पवार, राजकुमार नाईक, त्र्यंबक व्हटकर यांना रोटरीची पिन लावून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश मोटे तर आभार प्रदर्शन नूतन सचिव प्रकाश रोडगे यांनी मानले. गोविंद पाटील, डॉ. नितीन डागा, डॉ. कमलाकर मोटे, डॉ. महेश स्वामी, शिवशरण वरनाळे, आप्पासाहेब पाटील, उल्हास घुरघुरे, संतोष कांबळे, डॉ. महेश जिरोळे, डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. भूषण पाताळे, मल्लिकार्जुन बदोले, ॲड. उदय वैद्य, शिवकुमार स्वामी, बबन बनसोडे आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमास शहर व परिसरातील नागरिक, रोटरीयन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थिनी आर्या गाढवे ने लेखकाला दिली पुस्तकाची भेट



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** जालना येथील शांतिनिकेतन विद्यामंदीर या शाळेची विद्यार्थिनी कु. आर्या गाढवे यांनी आपल्या आजोबांनी लिहिलेल्या दर्जेदार व आशयघन असलेला "दखल" नावाचा वास्तववादी घटनांवर आधारित कवितासंग्रह" कौतुकाची थाप "याचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांना सन्मानपूर्वक "दखल" हा कवितासंग्रह सन्मानाने भेट दिला आहे. याप्रसंगी मराठवाड्याचे लोकप्रिय आणि लढवय्ये शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळेसाहेब, कवी मनोज खुटे, प्रदीप विखे, वाहेद शेखसर, मुदस्सर पठाण, साहेबांचे पीए प्रथमेश इत्यादी मान्यवर हजर होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद


8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जुलै २०२६


# डॉ.कुमार सप्तर्षी यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली




**मुंबई (बीड -भगवंत पाळवदे) :** ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, गांधीवादी नेते, लेखक आणि तरुण पिढीचे मार्गदर्शक डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनामुळे सच्चा गांधीवादी व समाजवादी 'सप्तर्षी' निखळला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील वंचित, शोषित घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि गांधीवादी विचारांच्या प्रसारासाठी समर्पित केले. युवक क्रांती दलाच्या (युक्रांद) माध्यमातून त्यांनी तरुणांमध्ये एक नवी ऊर्जा आणि सामाजिक जाणीव निर्माण केली. डॉ.सप्तर्षी हे अच्युतराव पटवर्धन एस.एम.जोशी, ना.ग.गोरे यांच्या समाजवादी परंपरेत वाढले. महात्मा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचे ते आयुष्यभर कट्टर अनुयायी राहिले. विविध आंदोलनांमध्ये त्यांच्या सक्रिय सहभागाने त्यांना ' सत्याग्रही ' म्हणून ओळख लाभली. त्या पुढे म्हणाल्या की, डॉ. सप्तर्षी यांच्या लेखनाने आणि भाषणांनी अनेकांना प्रेरित केले. त्यांच्या सामाजिक बांधिलकी आणि साधेपणाने ते सर्वांचे आदर्श होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यातही ते कायम अग्रेसर असत. विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी सभागृहात उमटवलेली छाप आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर केलेला संघर्ष कायम स्मरणात राहील. डॉ.सप्तर्षी यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# जय भवानी महाविद्यालयात "करिअर कट्टा" अंतर्गत विद्यार्थी संसदेची स्थापना




**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहितीतंत्रज्ञान साह्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "करिअर कट्टा " ची स्थापना करून विद्यार्थी संसदेचा शपथ ग्रहण सोहळा उसाहात संपन्न झाला. या प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते.तर प्रमुख उदघाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते . प्रारंभी करिअर कट्टा संसदेत नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांना गोपनियतेची व कर्तव्याची शपथ देण्यात आली. या वेळी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व करिअरविषयक उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प करण्यात आला. या प्रसंगी उदघाटक प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी सांगितले की विद्यार्थ्यामध्ये नेतृत्व गुण विकसीत होण्यासाठी व .आपल्या जबाबदाऱ्या समजण्यासाठी व करिअर मध्ये विकास करण्यासाठी अत्यंत महत्वाचा उपक्रम आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन योग्य लाभ घ्यावा! असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी " करिअर कट्टा " या व्यासपीटाचा योग्य उपयोग करून आपल्या भविष्याची दिशा निश्चित करावी असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. या प्रसंगी करिअर कट्टा विभागाच्या समन्वयक तथा विद्यापीठ अधिसभेच्या सदस्या प्रा.डॉ. कल्पना घारगे, प्रा. डॉ. सुनिल जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रा. विनोद किर्दक, नाटककार प्रा. बापू घोक्षे, क्रिडा विभागाचे प्रा.डॉ.प्रविण शिलेदार,प्रा.गोपाळ धांडे, प्रा. डॉ . बंडू लोखंडे,प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान, ग्रंथपाल प्रा.श्रीमती ज्योती रकटे आदि प्राध्यापक बांधव उपस्थित होते. या शपथ ग्रहण सोहळ्याचे दिमागदार संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. व आभार प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले.या प्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# म्हैसमाळच्या निसर्गसौंदर्याने पर्यटकांना घातली भुरळ



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** पावसाळ्याच्या आगमनानंतर हिरवाईने नटलेले म्हैसमाळ सध्या पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. धुक्याची दुलई, डोंगररांगा, दऱ्या, खळाळणारे धबधबे आणि आल्हाददायक वातावरण अनुभवण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने येथे भेट देत आहेत.सकाळच्या वेळेस संपूर्ण परिसर दाट धुक्याने वेढलेला असतो. क्षणाक्षणाला बदलणारे हवामान आणि ढगांचा डोंगरांशी सुरू असलेला लपंडाव पर्यटकांना मंत्रमुग्ध करतो. हिरव्यागार वनराईतून वाहणारे छोटे ओढे, उंच कड्यावरून कोसळणारे धबधबे आणि थंडगार वाऱ्याची झुळूक यामुळे पर्यटकांना अविस्मरणीय अनुभव मिळत आहे.शनिवार, रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी म्हैसमाळ येथे पर्यटकांची विशेष गर्दी होत असून अनेक जण कुटुंबासह किंवा मित्रमंडळीसोबत येथे येऊन निसर्गाचा मनमुराद आनंद घेत आहेत. अनेक पर्यटक सेल्फी, फोटोग्राफी आणि व्हिडिओ चित्रीकरण करत या रम्य क्षणांची आठवण जतन करत आहेत.म्हैसमाळ हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे मराठवाड्यातील थंड हवेचे ठिकाण प्रसिद्ध पर्यटनस्थळ असून पावसाळ्यात त्याचे सौंदर्य अधिक खुलून दिसते. प्रशासनाने पर्यटकांनी सुरक्षिततेचे नियम पाळावेत, धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे तसेच परिसर स्वच्छ ठेवून पर्यावरणाचे संरक्षण करावे, असे आवाहन केले आहे.वाहनांची गर्दी ट्राफीक जाम झाली आहे पावसाळ्यातील हिरवाई, धुक्याचा मनमोहक नजारा आणि शांत वातावरण यामुळे म्हैसमाळ पुन्हा एकदा पर्यटकांच्या पसंतीचे ठिकाण बनले असून येथील निसर्गसौंदर्य प्रत्येकाला अक्षरशः भुरळ घालत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जुलै २०२६

## झेब्रा

आफ्रिकन झेब्रा प्राण्याची
उंच उंच मान
काळे पांढरे पट्टे
अंगावर दिसतात छान

संकटाची चाहूल लागता
टवकारतो आपले कान
सावधपणे ठेवतो
सभोवताल भान

गवताळ प्रदेशात
कळपाने तो राहतो
गवत आणि पाने
आवडीने खातो

बचाव करण्यासाठी
सुसाट वेगाने पळतो
संकटावर मात करून
प्रसंगावधान राखतो

डौलदार त्याची चाल
मानेवर शोभे आयाळ
संरक्षणासाठी करतो
शत्रूला पायांनी घायाळ



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

# युवकांनी कौशल्य विकास प्रशिक्षणातून करिअर घडवावे - प्राचार्य डॉ. संजय अस्वले



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक पदवी पुरेशी नसून कौशल्य विकासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शासनाच्या विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ घेऊन युवकांनी स्वतःला सक्षम बनवावे. प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान, अनुभव आणि आत्मविश्वास यांच्या बळावर युवकांनी स्वतःचे उज्ज्वल करिअर घडवावे, असे आवाहन श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात केले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे जागतिक कौशल्य दिनानिमित्त मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (CMYKPY) अंतर्गत रुजू झालेल्या 18 युवकांना नेमणूक पत्र,वाटप आणि कौशल्य विकास, Startup मार्गदर्शन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू झालेल्या युवक-युवतींना नियुक्ती आदेशांचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले याच्या हस्ते वितरण करण्यात आले. तसेच कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविण्याचा आवा-हन केले. यावेळी धाराशिव जिल्हा कौशल्य विकास रोजगार मार्गदर्शन आणि उद्योजकता विभागाचे श्री.रोहित सुरवसे, कनिष्ठ कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी, उपप्राचार्य डॉ व्ही डी देवरकर, डॉ पी ए पिटले, यांची उपस्थिती होती.यावेळी श्री. रोहित सुरवसे यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची उद्दिष्टे, प्रशिक्षणाची प्रक्रिया आणि रोजगाराच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. कौशल्य विकास सहाय्यक श्रीमती विद्या नाडे यांनी शासनाच्या कौशल्यविकास उपक्रमांचा लाभ युवकांनी मोठ्या प्रमाणात घ्यावा, असे सांगितले. CMYKPY समन्वयक श्री. सुमितकुमार सुरवसे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सुविधा व जबाबदाऱ्यांची माहिती दिली.या कार्यक्रमास लिपिक-टंकलेखक श्री. बाबासाहेब शेटे,श्रीमती विद्या नाडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रशिक्षणार्थी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना प्रामाणिकपणे प्रशिक्षण पूर्ण करून कौशल्यसंपन्न नागरिक बनण्याच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मुरळीकर खंडू यांनी केले.

# लेखकाच्या भेटीतून विद्यार्थ्यांना मराठीची गोडी



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** बालभारतीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील " कौतुकाची थाप " इयत्ता चौथी या पाठाचे प्रत्यक्ष लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी छत्रपती संभाजी नगर येथील अगस्ती विद्यालय भगतसिंगनगर, यशदा विद्यालय मयूरपार्क, न्यू हायस्कूल हर्सुल, भारती हडको, सुपर थर्टी स्कूल एन-११ हडको, अभीज्योत विद्यालय हडको, ज्ञानसागर विद्यालय एन - १२ हडको, येथील शाळेत लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी, शिक्षकासोबत 'कौतुकाची थाप' या पाठावर दिलखुलासपणे चर्चा केली. आणि विद्यार्थ्यांनी विचारले-ल्या प्रश्नाला त्यांनी समर्पक उत्तरे दिली. प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील लेखकाला पाहून विद्यार्थी भारावून गेले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक लेखक, कवी निर्माण होऊन मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी व मराठी भाषेची विद्यार्थ्यांना गोडी निर्माण होईल म्हणून लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमाचे आयोजन मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळे यांनी केले होते. अशी माहिती राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे, यांनी दिलेली असून कवी मनोज खुटे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला आहे. या प्रसंगी वाहेद शेख, रमाकांत छडीदार, अकिल पठाण, रवींद्र तम्मेवार, मुदस्सर पठाण, दौलत खरात, आनंद खरात, सतीश देशमुख, सागर बोराडे, ज्ञानेश्वर काळे, मंजीत तुपे, ज्ञानेश्वर गोराडे ,गणेश सोनवणे, राजेंद्र शेवाळे, पारेश्वर साळवे, प्रवीण संसारे आदी उपस्थित होते.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

मराठवाड्यातील नं.१ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जुलै २०२६







# शिक्षणाचे लेणे, गरजूंच्या दारी; मुरूमच्या संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवण्याच्या उद्देशाने, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनकडून जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या सभागृहात रविवारी (ता. १९) रोजी गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शालेय पुस्तके वाटपाचा विशेष कार्यक्रम संपन्न झाला.सध्याच्या धावपळीच्या युगात अनेक हुशार मुले केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहतात. हे ओळखून फाउंडेशनने पुढाकार घेतला. गरजू विद्यार्थिनींना इयत्ता दहावीच्या पुस्तकांच्या संचाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंदाचे निरागस भाव उमटले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापिका विजया बेलकेरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, संत निरंकारी मिशन केवळ आध्यात्मिक विचारांचा प्रसार करत नाही, तर मानव कल्याणासाठी शिक्षण ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत आहे. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे म्हणजे भविष्यातील एका जबाबदार नागरिकाला घडवणे होय.शालेय पुस्तकांचे मोफत वाटप झाल्यामुळे पालकांनी फाउंडेशनच्या कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले. या उपक्रमामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणातील आर्थिक अडथळा दूर झाला असून, त्यांना आता अधिक उत्साहाने अभ्यासाला लागता येईल.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक संत निरंकारी मिशनच्या सेवा समितीचे पदाधिकारी, सेवादार यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, रोटरी क्लब मुरूमचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, ब्रांच मुखी दयानंद साखरे, जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या सहशिक्षिका सोनाली कलशेट्टी, मीरा मोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनकडून इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनीला पुस्तकांच्या संचाचे वाटप विजया बेलकरी यांच्या हस्ते करताना सोनाली कलशेट्टी, मीरा मोटे, सुधीर पंचगल्ले, महेश मोटे व दयानंद साखरे.






# चि. यश रामपूरकर यांचे NEET-UG 2026 मधे घवघवीत यश....



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** अथक परिश्रम जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर जिंतूर येथील चि. यश बाळासाहेब रामपूरकर यांनी देशातील सर्वात प्रतिष्ठित वैद्यकीय प्रवेश परीक्षा NEET-UG 2026 मध्ये घवघवीत यश संपादन करत रामपूरकर कुटुंबासह संपूर्ण परीवारांचा सामान उंचावला आहे. यश रामपूरकर ने उल्लेखनीय यशामुळे रामपूरकर परिवारात आनंदाची वातावरण निर्माण झाले असून त्याच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने जाहीर केलेल्या निकालानुसार यशने 720 पैकी 593 गुण मिळवत 99. 3676168 परसेंटाइल्स प्राप्त केला आहे. याशिवाय त्याने ऑल इंडिया रँक 12636 तसेच ओबीसी रँक 57 85 मिळवतवैद्यकीय क्षेत्रांच्या शिक्षणाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. देशातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत यश रामपूरकर ने आपल्या अथक मेहनतीचे सोने केले आहे. त्याच्या मेहनती मागे शिस्तबद्ध अभ्यास, वेळेची योग्य नियोजन, पालकाची सातत्यपूर्ण प्रोत्साहन, शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन आणि स्वतःची जिद्द व चिकाटी हे महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले. या यशामुळे रामपूरकर कुटुंबात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असून नातेवाईक, शिक्षक, मित्रपरिवार,पत्रकार, व्यापारी तसेच परिसरातील नागरिकांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यात तो एक कुशल संवेदनशील आणि समाजाभिमुख डॉक्टर म्हणून रुग्ण सेवेंच्या माध्यमातून नाम नाव कमावेल असा विश्वास सर्वांकडून व्यक्त केला जात आहे .यावेळी यश चा आयआयबी या शिक्षण संस्थेतर्फे सेलिब्रेशन करून सत्कार ही आयोजित केला त्याचा फेटा, शाल , भेट वस्तु व स्नेहांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. या आनंददायी क्षणाला उपस्थितांनी त्याच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत त्याच्या आनंद उत्साहात साजरा केला. जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील रामपूरकर परिवारातील पहिलाच एकमेव MBBS डॉक्टर होण्यांचा मान त्याने मिळवला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २० जुलै २०२६


# शाश्वत विकासाचा पाया: विज्ञान आणि मानव्यविद्येचा समन्वय




महाराष्ट्राला प्रदीर्घ वैचारिक, सामाजिक आणि शैक्षणिक वारसा लाभला आहे. परंतु, गेल्या काही वर्षांत आपल्या शिक्षण व्यवस्थेत आणि सामाजिक प्राधान्यक्रमात एक अत्यंत चिंताजनक बदल घडून आला आहे. आपण तंत्रज्ञानाच्या आणि आर्थिक प्रगतीच्या अशा एका शर्यतीत धावत आहोत, जिथे भौतिक सुबत्ता तर वाढत आहे, पण मानवी मूल्यांचा संकोच होत चालला आहे. आज कला, साहित्य आणि सामाजिक शास्त्रे (Humanities and Social Sciences) या विषयांकडे शासन आणि समाज या दोन्ही स्तरांवरून होणारे अक्षम्य दुर्लक्ष हे एका मोठ्या वैचारिक संकटाचे मूळ कारण बनले आहे. केवळ तंत्रज्ञानाने प्रगत असलेला समाज सुसंस्कृत असेलच असे नाही. जर आपल्याला खऱ्या अर्थाने एक अभिरुची संपन्न आणि प्रगल्भ समाज निर्माण करायचा असेल, तर विज्ञान-तंत्रज्ञानाला कला, साहित्य आणि सामाजिक शास्त्रांची जोड देणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. आजची शिक्षण व्यवस्था ही केवळ बाजारपेठेच्या गरजा पूर्ण करणारी 'कौशल्य निर्मिती केंद्र' बनली आहे. पालक आणि विद्यार्थी केवळ त्याच अभ्यासक्रमांना प्राधान्य देत आहेत, ज्यातून लवकरात लवकर मोठी आर्थिक पॅकेजेस मिळतील. परिणामी, तंत्रज्ञान, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि फिनटेक यांसारख्या विषयांकडे विद्यार्थ्यांचा ओढा प्रचंड वाढला असून भाषा, इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्र या विषयांचे विभाग ओस पडत आहेत. विज्ञानाने माणसाला उपजीविकेची साधने दिली, राहणीमान उंचावले आणि जगणे गतिमान केले, यात शंकाच नाही. परंतु, जगणे 'कसे' असावे, माणसाने माणसाशी 'कसे' वागावे, हे शिकवण्याचे काम केवळ सामाजिक शास्त्रे आणि साहित्यच करू शकतात. विज्ञानाकडे 'गती' आहे, पण त्या गतीला योग्य दिशा देण्याचे काम मानव्यविद्या करते. जेव्हा एखाद्या समाजात साहित्य आणि सामाजिक शास्त्रांचा प्रभाव कमी होतो, तेव्हा तो समाज विवेकाने समृद्ध होणे थांबते. या दोन्ही गोष्टींचा अभाव निर्माण झाल्यामुळे समाजात आज अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. आज समाजात वाढणारा टोकाचा आत्मकेंद्रीपणा, कौटुंबिक कलह आणि नात्यांमधील दुरावा हा साहित्याशी तुटलेल्या संपर्काचा परिणाम आहे. साहित्य माणसाला दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होण्याची 'सहानुभूती' शिकवते. तरुणांमध्ये वाढणारी गुन्हेगारी, अंमली पदार्थांचे व्यसन आणि छोट्या-छोट्या कारणांवरून होणारे हिंसक वाद हे मानसिक प्रगल्भतेच्या अभावातून येतात. तंत्रज्ञान माणसाला डिजिटल पद्धतीने जोडते आहे, पण मानवी मने परस्परांपासून दूर जात आहेत. केवळ भौतिक यशालाच जीवनाचे अंतिम ध्येय मानल्यामुळे मूल्यांची जागा पैशाने घेतली आहे. त्यातूनच भ्रष्टाचारासारख्या प्रवृत्ती समाजात खोलवर रुजल्या आहेत. जो समाज नैतिक मूल्यांपेक्षा केवळ आर्थिक नफ्याला महत्त्व देतो, तिथे भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनतो. हे प्रश्न आज आपल्या देशाच्या आणि समाजाच्या शाश्वत विकासाला सर्वात मोठे अडथळे ठरत आहेत. विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे हे एकमेकांचे विरोधी नसून पूरक आहेत. विज्ञानाने लावलेले शोध मानवाच्या कल्याणासाठी वापरले जावे की विनाशासाठी, हा निर्णय घेण्यासाठी मानवी विवेक जागा असावा लागतो. आज 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) आणि 'बायोटेक्नॉलॉजी' झपाट्याने विकसित होत आहेत, पण या तंत्रज्ञानाचे नैतिक निकष काय असावेत आणि यामुळे मानवी हक्कांवर काय गदा येईल, हे समजून घेण्यासाठी आपल्याला तत्त्वज्ञान आणि समाजशास्त्राचाच आधार घ्यावा लागेल. जगातील नामांकित विद्यापीठांचा इतिहास पाहिला, तर तिथे इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनाही साहित्य, कला आणि जागतिक इतिहासाचे धडे अनिवार्यपणे दिले जातात, कारण त्यांना केवळ 'यंत्र' तयार करायचे नसतात, तर समाजाचे भान असणारे सुजाण नागरिक घडवायचे असतात. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP) आंतरविद्याशाखीय शिक्षणावर भर देण्याचे बोलले गेले असले, तरी प्रत्यक्षात जमिनीवरील वास्तव वेगळे आहे. कला आणि सामाजिक शास्त्रांच्या महाविद्यालयांना मिळणारे अपुरे बजेट, जुनाट अभ्यासक्रम, संशोधनासाठी निधीचा अभाव आणि रिक्त असलेली हजारो प्राध्यापकांची पदे यामुळे या विद्याशाखांची दुरवस्था झाली आहे. शासनाने केवळ आयआयटी (IIT) किंवा आयआयएम (IIM) सारख्या तांत्रिक संस्थांवर लक्ष केंद्रित न करता, मानव्यविद्येच्या संशोधनासाठीही विशेष फेलोशिप आणि संस्थांची निर्मिती करणे गरजेचे आहे. जर आपल्याला ही घसरगुंडी थांबवायची असेल आणि एक सुसंस्कृत समाज टिकवून ठेवायचा असेल, तर तातडीने खालील पावले उचलावी लागतील. सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक्रम केवळ भूतकाळाची माहिती देणारे नसावेत, तर ते डिजिटल समाजशास्त्र किंवा पर्यावरणाचे राजकारण यांसारख्या समकालीन आव्हानांशी जोडलेले असावेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला कला आणि साहित्याचा किमान एक तरी विषय शिकणे अनिवार्य केले पाहिजे, जेणेकरून त्यांच्यात तांत्रिक कौशल्यासोबतच भावनिक प्रगल्भता निर्माण होईल. पालकांनी आपल्या पाल्यांना केवळ 'पैसा कमावण्याचे यंत्र' न बनवता, त्यांना पुस्तके वाचण्याची आणि कला आस्वाद घेण्याची सवय लावली पाहिजे. नाट्य, संगीत, ग्रंथोत्सव आणि वैचारिक व्याख्यानमाला यांसारख्या सांस्कृतिक उपक्रमांना पुन्हा एकदा लोकचळवळीचे स्वरूप द्यावे लागेल. भौतिक प्रगती आणि उत्तुंग इमारती म्हणजेच विकास नव्हे; तर त्या इमारतींमध्ये राहणाऱ्या माणसांचा वैचारिक व नैतिक स्तर किती उंचावला आहे, यावरून त्या देशाची खरी प्रगती मोजली जाते. कला, साहित्य आणि सामाजिक शास्त्रे हा समाजाचा आत्मा आहेत. जर आपण या आत्म्यालाच मारून टाकले, तर केवळ सिमेंट-काँक्रीटचे जंगल आणि विवेकाशिवाय जगणारी यंत्रमानवांची वस्ती उरेल. उच्च शिक्षणाची आणि सामाजिक मूल्यांची ही घसरगुंडी थांबवायची असेल तर आता केवळ तात्पुरती मलमपट्टी करून चालणार नाही. शासनाने आणि समाजाने एकत्र येऊन विज्ञानाच्या गतीला मानव्यविद्येच्या मतीची जोड दिलीच पाहिजे; अन्यथा पुढील काही वर्षांत आपण आर्थिकदृष्ट्या श्रीमंत, पण सांस्कृतिक आणि नैतिकदृष्ट्या दिवाळखोर समाज म्हणून जगासमोर उभे राहू.


**प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे**
**प्रमुख, समाजशास्त्र विभाग,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.**



